-::- <u>प्रेस नोट</u> -::- दि. १९/०८/२०२६

## महिलेचा गळा आवळून निर्दयपणे खुन करणाऱ्या ०५ आरोपीतांना पंतनगर पोलीस ठाणेकडून अटक.

दि.१७/०८/२०२६ रोजी रात्रौ. ०१.०० वा.चे सुमारास राजावाडी हॉस्पीटल, घाटकोपर येथून 'महिला नामे श्रीमती सपना प्रमोद गंजी, वय ३५ वर्षे, रा.ठी. त्रिवेणी बिल्डींग डी विंग, रूम नं. २०४, लक्ष्मीनगर, घाटकोपर, मुंबई ही दि.१६/०८/२०२६ चे रात्रौ. ०९.३० वा.चे सुमारास राहते घरी बाथरूम मध्ये पाय घसरून पडल्याने तिला तिची सासू नामे श्रीमती धनलक्ष्मी भिक्षापती गंजी, वय ६० वर्षे हिने प्रथम औषधोपचाराकरीता सुप्रीम हॉस्पीटल, घाटकोपर येथे नेले आणि नंतर राजावाडी हॉस्पीटल येथे आणले असता, डॉक्टरांनी तपासून रात्रौ. १२.४१ वा. मयत घोषित केले.' असा संदेश प्राप्त झाला होता.

सदरचा संदेश प्राप्त होताच पंतनगर पोलीस ठाणेचे ठाणे अंमलदार व पथक राजावाडी रूग्णालय येथे गेले. मृतदेहाची पाहणी केली असता, मृतदेहाच्या गळयाभोवती काळे -निळे डाग दिसत होते व डोक्याच्या डाव्या बाजुस रक्तस्त्राव होत होता, त्यामुळे पोलीसांचा संशय बळावला. तेथे उपस्थित असलेली मयत हिची सासू श्रीमती धनलक्ष्मी भिक्षापती गंजी हिचेकडे विचारपूस केली असता, तिने मयत महिलेसोबत भांडण झाल्याने तिला ढकलून दिल्याने ती बाथरूममध्ये पडून डोक्याला लागून मयत झाल्याचे सांगीतले. तपासामध्ये मयताची सासू धनलक्ष्मी गंजी हिने सुन सपना गंजी हिचे डोके कोणत्यातरी कठीन भागावर आपटून खुन केल्याचे प्रथम दर्शनी निष्पन्न झाले. त्यानुसार मयत हिचे वडील श्री.राजेंद्र नरसया वल्लाळ, वय ६३ वर्षे, यांचे तक्रारीवरून पंतनगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ८६२/२०२६, कलम १०३(१), ११५(२), ३५२ भा.न्या.सं. अन्वये दि. १७/०८/२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयात मयत सपना गंजी हिची सासु श्रीमती धनलक्ष्मी भिक्षापती गंजी हिला दि.१७/०८/२०२६ रोजी अटक करण्यात आली. अटक महिलेस रिमांडकामी मा.न्यायालयात हजर केले असता तिला दि. २४/०८/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

पोलीस काठडी दरम्यान अटक आरोपी हिचेकडे तपास केला असता तिने सांगीतले की, मयत हिस दारू पिण्याचे व्यसन होते आणि तिचे विवाहबाहय संबंध होते. या व्यतिरिक्त मयत महिलेने सासरच्या लोकांविरूध्द् नालासोपारा पोलीस ठाणे येथे सन २०२४ साली कलम ४९८(अ), ३७७, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद केला होता. आणि डोमॅस्टीक व्हायलन्स ॲक्ट अन्वये तक्रार दाखल केली होती. सदरचा राग अटक आरोपीच्या मनात होता. मयत महिला ही जून २०२६ मध्ये दुबईहून सुटटीकरीता मुलासोबत मुंबईत आली आहे त्यानंतर साधारणत: एक महिण्यापुर्वी अटक आरोपी हिने तिची पुर्वीची मोलकरीण मंगला जाधव आणि तिचा मुलगा, पती व मुली सोबत मयत महिलेचा मिर्ची पुड डोळयात टाकुन, गळा आवळून खुन करण्याचा कट रचला. त्या बदल्यात मोलकरीण व तिच्या कुटुंबियांना ०३ लाख रूपये देण्याचे ठरविले.

अधिक तपासामध्ये घटनास्थळावरील तांत्रीक पुरावे, सीसीटीव्ही फुटेजची पाहणी व अटक आरोपीकडे केलेल्या तपासामध्ये सदचा गुन्हा हा अटक आरोपी क्र. १. श्रीमती धनलक्षी गंजी (मयताची सासू) हिने आरोपी क्र. २. मंगलाबाई सुरेश जाधव, वय ४५ वर्षे (मयताची मोलकरीण), आरोपी क्र. ३.

शिवानी सुरेश जाधव, वय २१ वर्षे (मोलकरणीची मुलगी), आरोपी क्र. ४ सुरेश गणपत जाधव, वय ४६ वर्षे (मोलकरणीचा पती) आणि आरोपी क्र. ५ साजन सुरेश जाधव, वय १९ वर्षे (मोलकरणीचा मुलगा) यांनी कट रचून मयत महिला ही दि. १६/०८/२०२६ रोजी दुपारी १६.४५ वा.चे सुमारास एकटीच घरामध्ये असताना वर नमुद सर्व आरोपीतांनी एका पाठोपाठ एक असे घरामध्ये प्रवेश केला आणि मयत महिला ही दारूच्या नशेत असताना तिचे डोक्यात काचेचा ग्लास मारून तसेच डोळयात मिर्ची पुड टाकून, तिचा ओढणीने गळा आवळला त्यानंतरदेखील तिचा जिव जात नसल्याने आरोपी क्र. ४ व ५ हे मयत महिलेच्या गळयावर पाय देवून उभे राहिले आणि तिला जिवे ठार मारले. त्यानंतर घटनास्थळावरील पुरावे नष्ट केले. सदर गुन्हयात आरोपी क्र. २ ते ५ यांना दि.१८/०८/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींना मा. न्यायालयाने दि. २८/०८/२०२६ रोजीपर्यंत पोलीस काठडी दिली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा.पोलीस आयुक्त, श्री देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त (का. व सु.) श्री मनोजकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, श्री.धनंजय कुलकर्णी, मा. पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ २ श्री गणेश शिंदे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. विलास दातीर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक लता सुतार, पोलीस निरीक्षक परशुराम लोंढे, पोलीस निरीक्षक अजित गोंधळी, पोलीस निरीक्षक राजेश चंदुगडे, पोलीस निरीक्षक अस्लम खतीब, सपोनि उमेश शिंदे, सपोनि दगडू जाधव, सपोनि प्रशांत कुंभार, पोउनि गोडबोले, मपोउनि चट, पोउनि काटकर, पोउनि गुमलाडू, सफौ रमेश पवार, पोह भाऊसाहेब घुगे, अविनाश इंगळे, पो.अंमलदार दत्तू पवार, नारायण दळवी, रवि चव्हाण यांनी केली आहे.